मूल्यवर्धन

# प्रेरणा

महाराष्ट्र संवादपत्र १ - जानेवारी ते मार्च २०१९




## मनोगत...



शिक्षक आणि अधिकारी बंधू भगिनींना मूल्यवर्धन कार्यक्रमाविषयी संवादपत्र पाठविण्याच्या निर्णयाचे प्रथम मी हार्दिक स्वागत करतो. आतापर्यंत राज्याच्या निम्म्या तालुक्यातील शाळांमध्ये या कार्यक्रमामुळे संविधानातील मूल्ये बालस्नेही आणि कृतीशील रीतीने पोहोचत आहेत ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. एससीईआरटी आणि शांतिलाल मुथ्था फाउंडेशनने एकत्रितपणे शाळा/वर्गभेटी, मूल्यवर्धन App यांच्या सहाय्याने सातत्याने या कार्यक्रमाचा मागोवा घेतला आहे. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि मा. शिक्षण मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांनी वेळोवेळी या कार्यक्रमाचा आढावा घेऊन या कार्यक्रमाला दिशा दिली आहे. मी स्वतः अनेक शाळांमध्ये भेटी देऊन वर्गात मूल्यवर्धन उपक्रम कसे आयोजित केले जातात हे पाहिले आहे. शिक्षक आणि अधिकारी यांची मतेही जाणून घेतली आहेत. मूल्यवर्धन कार्यक्रमातून अनौपचारिक दडपणमुक्त वातावरणात सहयोगी अध्ययन, मूल्यांची जाणीव विकसित करणारी चर्चा, यातून परस्पर आस्था, सामाजिक भावना तयार होऊन लोकशाही मूल्ये हळू हळू रुजताना दिसत आहेत. मूल्यवर्धन उपक्रम हाताळताना मुलांना सतत उत्तेजन देऊन सहयोगातून विधायक सृजनशील विचार आणि कृती करायला लावणारी ही पद्धती, इतर विषयांसाठी देखील उपयोगी असल्याचा शिक्षकांचा अभिप्राय आहे. काही शिक्षकांनी स्वतःच्या कल्पकतेने समांतर असे नाविन्यपूर्ण उपक्रमही तयार केले आहेत. हे उत्साहाचे वातावरण असेच टिकून राहावे यासाठीही तसेच जे विशेष प्रयत्न करीत आहेत ते एकमेकांना माहीत होणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून हे वार्तापत्र मूल्यवर्धन कार्यक्रम आणि शाळांमध्ये निर्माण झालेली ही उर्जा टिकवण्यासाठी एवढेच नाही तर वाढविण्यासाठीही उपयोगी पडेल असा विश्वास मला वाटतो. मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या संवादपत्राला तसेच या कार्यक्रमाची अंमलबजावणी यापुढे अशीच उत्साहाने करण्यासाठी सर्व शिक्षक आणि अधिकारी यांना माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा.

**डॉ. सुनिल मगर,संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे**

### या संवादपत्रात हे पहाल :

मनोगत १
मूल्यवर्धन पोहोचते आहे सर्व शाळांत १
मूल्यवर्धन विषयी थोडक्यात २
अधिकारी वर्गाचे अभिप्राय २
शिक्षकांच्या नजरेतून ३
मूल्यवर्धन यशोगाथा ४
SMF मास्टर ट्रेनरचे मनोगत ५
मूल्यवर्धन शिक्षकांसाठी ५
मूल्यवर्धन वार्ता ६
वृत्तपत्रांनी घेतलेली दखल ७
मान्यवरांचे अभिप्राय ८

## मूल्यवर्धन पोहोचते आहे सर्व शाळांत

| वर्ष | जिल्हे | तालुके | केंद्र | शाळा | विद्यार्थी (इ.१-४) | प्राथमिक शिक्षक |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | ३४ | ३५ | ६३ | ७२४ | ३०००० | २००० |
| २०१७-१८ | ३५ | १०७ | १६१८ | १८५७२ | ९३३६७१ | ५०८८७ |
| २०१८-१९ | ३६ | २१५ | ३१६३ | ४०२३१ | २२६५२४९ | ११५१२६ |
| - मराठी | ३५ | २१५ | ३१६३ | ३७५०८ | २०१९९४८ | १०५७०९ |
| - उर्दू | ३६ | १२ | - | २५१० | १९३०२८ | ८१४८ |
| - इंग्रजी | ११ | ४० | - | २१३ | ५२२७३ | १२८९ |
| २०१९-२० | ३६ | ४०५ | ५४८७ | ६७००० | ३७८४००० | १९२००० |

## मूल्यवर्धन विषयी थोडक्यात

सामाजिक, शैक्षणिक आणि आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते श्री. शांतिलाल मुथ्था यांनी २००९ मध्ये मूल्यवर्धन कार्यक्रमाची संकल्पना मांडली. त्यानुसार महाराष्ट्रातील बीड जिल्हा परिषदेच्या परवानगीने आष्टी व पाटोदा तालुक्यांतील जिल्हा परिषदेच्या ५०० प्राथमिक शाळांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यास सुरुवात झाली. एनसीईआरटीकडून या कार्यक्रमाचे मूल्यमापन झाले. इंग्लंड मधील केंब्रिज विद्यापीठ या आंतरराष्ट्रीय संस्थेकडून तसेच अमेरिकेतील ओरेगॉन विद्यापीठातील ब्रायन फ्लेसारख्या तज्ज्ञाकडून या कार्यक्रमाची फलनिष्पत्ती तपासण्यात आली. त्यामधून मुलांमध्ये सकारात्मक बदल घडल्याचे निष्पन्न झाले. सलग सात वर्षे हा कार्यक्रम जि. प. च्या शाळांमध्ये राबवत असताना मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक व शिक्षणाधिकारी या सर्वांकडून मिळालेल्या सूचनांचा कार्यकम विकसनामध्ये महत्त्वाचा वाटा आहे. या सर्व प्रायोगिक अंमलबजावणीतील अनुभवांच्या आधारे, राष्ट्रीय व राज्य शैक्षणिक आराखडे व शिक्षण हक्क कायदा यांना पूरक असा मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आराखडा २०१५ मध्ये शांतिलाल मुथ्था फाउंडेशनने तयार केला.

मूल्यवर्धन कार्यक्रम हा भारतीय राज्यघटना, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF-२००५), बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणासंबंधीचा कायदा (RTE-२००९) तसेच अध्ययन निष्पत्तीशी यांच्याशी सुसंगत आहे.

**मूल्यशिक्षणासंबंधीचा समग्र शाळा दृष्टिकोन :**

- मूल्यवर्धन कार्यक्रमात समग्र शाळा दृष्टिकोन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. ही कार्यपद्धती मूल्ये शिकविण्याच्या पारंपरिक पद्धतीपेक्षा अधिक परिणामकारक आहे. एनसीईआरटी या संस्थेनेही या कार्यपद्धतीची शिफारस केलेली आहे.
- मूल्यवर्धन कार्यक्रमात मूल्यांचा सर्वसमावेशक विचार केलेला आहे. त्यात मूल्यांच्या बोधात्मक (जाणणे, विचार करणे); भावात्मक (भावना, दखल घेणे, बांधीलकी जपणे) आणि क्रियात्मक पैलूंचा विचार केला गेला आहे.
- शाळेतील एकंदर वातावरण तसेच शाळेचे नेहमीचे कामकाज मूल्याधिष्ठित व्हावे व त्यातून विद्यार्थ्यांनी लोकशाहीधिष्ठित मूल्ये शिकावित तसेच या मूल्यांशी संबंधित दृष्टिकोन व क्षमता विकसित कराव्यात यासाठी मूल्यवर्धन कार्यक्रमात सुस्पष्ट अशा शैक्षणिक पद्धतींचा वापर केलेला आहे. कोणत्याही शाळेत वापरता येण्याजोगी व लवचिक अशी कार्यपद्धती आहे.
- शांतिलाल मुथ्था फाउंडेशनच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने कोणत्याही शाळेच्या गरजा, प्राधान्यक्रम व संसाधने विचारात घेऊन मूल्यवर्धन कार्यक्रमाची अंमलबजावणी करता येते.
- हा कार्यक्रम राबविण्यासाठी वेगळी आर्थिक तरतूद करावी लागत नाही किंवा त्यासाठी वेगळे मनुष्यबळ वापरावे लागत नाही.
- काळाच्या ओघात योग्य ते बदल करत शाळा हा कार्यक्रम वर्षानुवर्षे राबवू शकतील.

## अधिकारी वर्गांचे अभिप्राय




**संजयकुमार राठोड,**
शिक्षणाधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर

महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र शासन व शांतिलाल मुथ्था फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महत्वाकांक्षी असा मूल्यवर्धन कार्यक्रम शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ पासून सुरू आहे. सोलापूर जिल्हयातील ३ तालुक्यांमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम यशस्वीपणे घेण्यात आलेला आहे. चालू शैक्षणिक वर्षामध्ये जिल्ह्यात ८ तालुक्यामध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम अंमलबजावणी यशस्वीपणे व आनंददायी वातावरणात चालू आहे. सदर मूल्यवर्धन कार्यक्रमास सोलापूर जिल्ह्यामध्ये शिक्षक व विद्यार्थी यांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळत आहे. मूल्यवर्धन कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये दिसून आलेले बदल :

१. भविष्यात चांगला नागरीक होण्यासाठी आवश्यक मूल्यांची माहिती विद्यार्थ्यांना होत आहे.
२. मुलांचे लक्षपूर्वक ऐकूण घेणे व विचारपूर्वक बोलणे या बाबी विकसित होत आहे.
३. विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये जवळीकता निर्माण झाली आहे.
४. विद्यार्थी विविध उपक्रमांमध्ये शिक्षकांच्या सोबत सहभागी झाल्याने विद्यार्थ्यांच्या मनातील भीती व न्यूनगंड नाहीसा झाला आहे.
५. उपक्रमांशी संबंधित शिक्षक व वर्गमित्रांशी चर्चात्मक गप्पा मारल्याने विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होणेस वाव मिळाला आहे.
६. इतरांचा आदर करण्याची सवय विद्यार्थ्यांमध्ये विकसित होत आहे.
७. सर्वधर्मसमभाव या वृत्तीनुसार वागणे हा दृष्टिकोन विकसित होत आहे.
८. गरजू व्यक्तींना मदत केली पाहिजे हा विचार विद्यार्थ्यांच्या मनामध्ये रूजण्यास मदत झाली आहे व विद्यार्थ्यांमध्ये असा विचार करण्याची वृत्ती निर्माण होत आहे.
९. यामधून राष्ट्रीय दहा गाभाभूत घटकांचे मूल्य विद्यार्थ्यांच्या अंगी रूजण्यास मदत होत आहे.

शांतिलाल मुथ्था फाउंडेशन व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने महत्वाकांक्षी अशा मूल्यवर्धन कार्यक्रमास हार्दिक शुभेच्छा...!!



**श्री. मल्हारी बनसोडे,**
गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उत्तर सोलापूर

महाराष्ट्र शासन व शांतिलाल मुथ्था फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षात राज्यातील काही निवडक तालुक्यामध्ये इयत्ता पहिली ते चौथीच्या वर्गांमध्ये प्रायोगिक तत्वावर मूल्यवर्धन कार्यक्रम राबविण्यात आला, त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील प्रामुख्याने उत्तर सोलापूर, सांगोला व करमाळा या तीन तालुक्यांचा समावेश होता. त्याप्रमाणे मूल्यवर्धन कार्यक्रम उत्तर सोलापूर तालुक्यात यशस्वीपणे राबविण्यात आला. चालू वर्षी सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षातही या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. या कार्यक्रमामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या बालमनात घटनात्मक मूल्यांची रूजवणूक होवून बालकांमध्ये वर्तनबदल, दैनंदिन जीवनातील नियम, स्वयंशिस्त इ. वाढीस लागून लोकशाहीभिमूख नागरीक बणण्यासाठी नक्कीच मदत होत आहे. याशिवाय शिक्षकांमधील परस्पर सहसंबंध सुधारण्यास प्रोत्साहन मिळत आहे. मूल्यवर्धन कार्यक्रमाची विद्यार्थ्यांसाठी इयत्तानिहाय उपक्रमपुस्तिका तसेच शिक्षकांसाठी उपक्रमपुस्तिका आणि शाळेसाठी वर्ग उपक्रमाचे आयोजनपुस्तिका शासनामार्फत उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याचा वापर करून सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. चालू शैक्षणिक वर्षात प्रशासकीय बदली झालेल्या शिक्षकांनादेखील प्रशिक्षित करून मूल्यवर्धन कार्यक्रम राबविण्यात येत आहे. मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या आठवड्यातून तीन तासिका घेण्यात येतात. त्याचा परिणाम चांगला दिसून येत आहे. सदरचा कार्यक्रम खूप स्तुत्य आहे. मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा!!

## मूल्यवर्धन :- सुसंस्कृत जीवनाचा पाया

**श्री.सुरेश नारायण तायडे,**
जि.प.प्रा.शाळा, चिंचखेड, केंद्र : जांबुळधाबा, ता. मलकापूर, जि. बुलडाणा



ज्यावर संपूर्ण समाजाचा पाया अवलंबून आहे, ती नैतिक मूल्ये जर समाजात रुजली नाहीत तर समाजाचे अधःपतन होण्यास वेळ लागणार नाही. कुटुंबातून मुलांना संस्कार दिले जातात. शाळेत विविध उपक्रमांमधून नीतिमूल्ये मुलांच्या मनावर बिंबवली जातात. तरी सुद्धा आपण समजात अशा घटना घडतांना पाहत असतो ज्यामुळे साहजिक आपल्याला प्रश्न पडतो. खरंच मुलांवर संस्कार झालेत का? कुटुंब, शाळा, आजूबाजूच्या च्या परिसरात छोट्या छोट्या गोष्टींमधून मुलांवरचे संस्कार प्रतिबिंबित होत असतात.पण बऱ्याच वेळेस लहानांच्या छोट्या छोट्या चुकांकडे आपण दुर्लक्ष करतो आणि मग एकदा का घडा पक्का झाला की मग त्यावर संस्कार करणे आपल्या आवाक्याबाहेरचे होते. त्यामुळे लहानपणापासून मुलांवर मूल्यांची सहेतुक रुजवणूक करावी, जेणेकरून मोठेपणी तो देशाचा आदर्श नागरिक घडू शकेल. हाच उद्देश डोळ्यांसमोर ठेवून शांतिलाल मुथ्था फाऊंडेशनने मूल्यवर्धन हा उपक्रम महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने संपूर्ण महाराष्ट्रात सुरू केला.

सुरुवातीला जेव्हा आम्ही प्रशिक्षण घेण्यासाठी प्रेरक म्हणून आलो, तेव्हा वाटलं, ह्यात काय नवीन? हे तर आपण आपल्या शाळेत नैतिक मूल्याच्या तासिकेला घेत असतो. पण जसं जसं प्रशिक्षण पुढे जात होतं तसं तसं प्रशिक्षणातील फरक लक्षात यायला लागला. मुलांच्या आवडीनुसार, विविध उपक्रम आणि सहशालेय खेळाचे महत्व पटायला लागले. जेव्हा प्रार्थनेसाठी जमलेल्या मुलांना शांत बसा म्हणता म्हणता घसा बसायचा, तिथे केवळ 'शांतता संकेत' वापरून सगळं वातावरण शांत करायला तोंडातून ब्र काढायची गरज नाही, हे ह्या उपक्रमातून समजले. मुलांची पेन्सिल, खोडरबर, पुस्तके अव्यवस्थित व्हायची ती आता स्वच्छ राहायला लागली. स्वशिस्त, स्वावलंबन, मोठ्यांचा आदर करायला शिकणे, आपल्यापासून, नंतर कुटुंब, परिसर, देश, विश्व याविषयी नीतिमूल्ये आत्मसात करणे, ह्या सगळ्या गोष्टी या मूल्यवर्धन उपक्रमातून मुलांच्या मनावर ठसवल्या गेल्या. मोठ्या माणसांना आपल्या शेजारच्यांची नावे विचारली तर सांगता येणार नाही, मात्र मूल्यवर्धन च्या उपक्रमामुळे मुले आपल्या आजूबाजू असलेल्या सर्वांची नावे चटकन सांगू लागली. ज्यामुळे एकमेकांचा संपर्क साधून त्यांच्यात एक सौहार्दाचे नाते निर्माण झाले. आवाज दिल्यानंतर सुद्धा न थांबणारी मुले, आता शेजाऱ्या-पाजाऱ्यांची छोटी छोटी कामे करू लागली. झालेला बदल लोकांच्या लक्षात यायला लागला. त्यामुळे पालक शिक्षकांकडे चौकशी करू लागले. शिक्षक-पालक संपर्क वाढायला सुद्धा मूल्यवर्धनची खूप मदत झाली. कालपर्यंत शाळेचे तोंड न पाहणारे विद्यार्थी आनंदाने शाळेत येऊ लागले, रमू लागले आणि इतर विद्यार्थ्यांसोबत मिसळून राहू लागले. शिक्षकांविषयीची भीती मुलांमधून निघाली. त्यामुळे अध्ययन-अध्यापन निकोप होऊ लागले. हसतखेळत शिक्षणाचा आनंद मुले घेऊ लागली.

मुले स्वतःचे नियम स्वतः तयार करून, त्याच अनुपालन होते की नाही हे स्वतःच पारखून पाहू लागली. शाळेत घंटा न वाजवता मुले स्वतःहून वेळेवर शाळेत यायला लागली. भावाला सांभाळण्यासाठी भाग्यश्री नेहमी शाळेत यायला टंगळमंगळ करायची. ती भावाला शाळेत घेऊन येऊ लागली. सर्व कचरा स्वतः गोळा करून कचरापेटीत टाकायला लागले. वृक्षारोपण झाल्यानंतर मुलं केवळ आपल्या झाडांची निगा राखायची, पाणी द्यायची. दुसऱ्याच्या झाडांना मात्र पाहत देखील नव्हती. शाळेत मूल्यवर्धन उपक्रम राबवल्यानंतर आता स्वतःच्या झाडाबरोबर दुसऱ्यांच्या झाडांचीही काळजी घ्यायला लागली. पर्यावरणाचे रक्षण केले तरच वृक्ष जिवंत राहतील आणि वृक्ष जिवंत राहिले तर आपण जिवंत राहू, हे मुलांच्या मनावर बिंबवण्यासाठी मूल्यवर्धन उपक्रमाचा खूप मोठा हातभार लागला, तो शांतिलाल मुथ्था फाऊंडेशनच्या मूल्यवर्धन उपक्रमामुळे...

**श्री. सुनिल पत्रुजी कोवे**
जि.प.प्राथ.शाळा पळसगाव, ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर

**१) शाळेत MV अंमलबजावणी करताना आलेले काही विशेष अनुभव?**

विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा वाढीस लागली विद्यार्थी हस्तपुस्तिकेत रमून जातात. प्रामाणिकपणे काहीतरी करण्याची भावना विद्यार्थ्यांत निर्माण झाली.

**२) मूल्यवर्धनची पुस्तके आणि दृकश्राव्ये साहित्य कितपत प्रभावी वाटले?**

मूल्यवर्धनची पुस्तके अतिशय प्रभावी साधने म्हणून प्रेरकांना उपयोगी पडत आहे. ज्यामुळे मूल्यवर्धन कार्यक्रम राबवितांना कौशल्ये आणि शिक्षण एकत्र देता येते.

**३) मूल्यवर्धन प्रेरक ही जबाबदारी पेलताना कोणते अनुभव आले?**

प्रेरक म्हणून विषयाचे ज्ञान तर महत्वाचे असते पण त्याहूनही महत्वाचे ठरते ते म्हणजे समोर बसलेल्या सहकारी शिक्षकांना विषयाची माहिती योग्य रीतीने पोहोचविणे आणि त्यासाठी लागते ती अथक अभ्यास आणि अनुभवाची जोड.

**४) मूल्यवर्धन वर्ग उपक्रम सातत्याने राबविण्यासाठी कोणती पावले उचलली?**

१) मूल्यवर्धन कार्यक्रम राबविण्यासाठी वेळापत्रक बनविले.

२) मूल्यवर्धन कार्यक्रम कोणकोणत्या दिवशी याची कल्पना विद्यार्थ्यांना दिली.

३) मूल्यवर्धन तासिकेची शिक्षकाला आठवण करून द्यावी अशी विद्यार्थ्यांना सूचना केली.

४) मूल्यवर्धनाचा तास वर्गाबाहेर निसर्गाच्या सानिध्यात घेत असतो.

**५) महाराष्ट्रातील सर्व मूल्यवर्धन राबवण्याऱ्या शिक्षकांसाठी संदेश :**

केवळ पुस्तकी ज्ञानच पुरे नाही तर शिक्षणात कौशल्य तथा मूल्याची जोड असल्याशिवाय जीवन आनंदाने जगता येणार नाही. इतरांना आनंद देता येणार नाही. संवेदनशील नागरिक तयार करणे ही काळाची गरज आहे.



## शिक्षकांच्या नजरेतून

**सौ. तृप्ती नितीन तोडकर**
जि.प.प्रा. केंद्र शाळा, लोहगाव, ता. हवेली, जि.पुणे.

दिनांक १८ ते २१ जुलै २०१७ या चार दिवसात मूल्यवर्धनची कार्यशाळा पार पडली. अगदी खर सांगायचं झालं तर आम्ही या कार्यशाळेत पूर्वग्रहदुषित ठेऊनच गेल्यासारखं आम्हाला जाणवलं. कारण या उपक्रमाची आधी काहीच माहिती नाही. मूल्यवर्धन नाव ऐकल्यावर असे वाटले की आपण हे घेत नाही का? या आधी हे सगळ करत नव्हतो का? आणि मग यासाठी चार दिवस कशाला? असे काहीसे घेऊनच आम्ही कार्यशाळेत पाऊल ठेवले होते. पण जेव्हा कार्यशाळा सुरु झाली आणि चार दिवसात संपन्न झाली तेव्हा असे लक्षात आले की खरंच आपण काहीच करत नव्हतो. आपल्याकडून खूप काही उपक्रम करायचे राहून गेले होते. कार्यशाळेत जे तज्ञ मार्गदर्शक होते, त्यांचे विचार, त्यांची तळमळ, उपक्रमावरची त्यांची निष्ठा, त्यांचे निरीक्षण, त्यांच्या वागण्या– बोलण्यातील खरेपणा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांची साधी राहणी व प्रेमळ वाणी मनाला स्पर्शून गेली.

असं सगळं असलं तरी प्रत्यक्ष उपक्रमास सुरुवात झाली तेव्हा रोज नवा अनुभव मिळत गेला. मुलांचे विविध पैलू समोर आले. मुलांच्या वर्तनातील खरा–खोटा तसेचतात्पुरता बदल पहावयास मिळाला. कारण माझ्या शाळेत येणारी ६०% मुले ही निहार या वंचित विकास संस्थेमधील आहेत. जेव्हापासून माझ्या शाळेत मूल्यवर्धन उपक्रमास सुरुवात झाली तेव्हापासूनच मुलांमध्ये बदल जाणवायला लागले. पण पालकांशी संवाद झाला तेव्हा जाणवले की मुले शाळेत खूप छान वागतात परंतु घरी असणाऱ्या वर्तनात बदल झाला नव्हता. शाळेत मात्र अपेक्षेप्रमाणे बदल झाला होता. ते सभेत धीटपणे बोलायला, स्वतंत्रपणे विचार करायला शिकले, आपले मत योग्य पध्दतीने मांडायला शिकले, योग्य–अयोग्य यातील फरक ओळखायला शिकले, इतक सगळं छान असूनही मनाला खंत वाटत होती, ती म्हणजे मुलांच्या या दुहेरी वागण्याची.

पण या गोष्टीच्या मुळापर्यंत जाऊन पहिले असता मुलं खर तर दुहेरी वागत नव्हती. तर घरी असणारं वातावरण, घरातील मोठी व्यक्ती कशी वागतात ते पाहूनच ती मुलं तशी वागत असल्याचे जाणवले. पण असे उपक्रम अधिक होत गेले, मुलांशी असणारा संवाद वाढत गेला तेव्हा मुले माझ्या समोर आणि माझ्या विरहीत एकाच पद्धतीने वागताना, बोलताना दिसून आले. ते योग्य मार्गाने विचार करत आहेत. आपले मत स्पष्टपणे मांडत आहेत. सर्वांशी प्रेमाने वागत आहेत. अगदी छोट्या–छोट्या गोष्टीत एकमेकांचा विचार करत आहेत. या अनुभवांमुळे मला खूप छान वाटत आहे.

सुरुवातीला माझी स्वतःची मुले घरी पाहिली की शाळेतील मुलांविषयी वाईट वाटायचं. त्यांच्यासाठी आपल्याला खूप काही करावे लागणार आहे या जाणीवेतून तसं मी करण्याचा प्रयत्न करायचे, पण आता शाळेतील मुलांचे विचार, त्यांचे शिक्षण, त्यांचे घडत असलेलं व्यक्तिमत्व पाहिले की असे वाटते माझ्या घरच्या मुलांना हे संस्कार कसे मिळणार, त्यांना छोट्या–छोट्या गोष्टी कशा समजणार? पण खरच सलाम शांतिलाल मुथ्था फाउंडेशनला, त्यांच्या सर्व टीमला आणि त्यांच्या या विचारसरणीला. धन्यवाद!

## मूल्यवर्धन यशोगाथा

**सौ. रेखा प्रकाश टिळेकर**
जि.प.प्रा. शाळा कटकेमळा, केंद्र : चांबळी, ता. पुरंदर, जि. पुणे

**१ शाळेच्या वातावरणामध्ये झालेला बदल :**
विद्यार्थी दररोज वेळेवर शाळेत येऊन स्वतःच शाळेचे आवार स्वच्छ ठेवत आहेत आणि प्रत्येकाला वाटून दिलेल्या कामानुसार सर्व कामे व्यवस्थितरित्या पार पाडू लागलीत; त्यामुळे शाळेचे वातावरण शांत आणि प्रसन्न राहत आहे.

**२ विद्यार्थ्यांमध्ये झालेला बदल :**
मुले प्रत्येक बाबीत स्वतः सहभागी होऊ लागली आहेत. स्वतंत्रपणे विचार करू लागली आहेत. इतरांशी आदर पूर्ण रीतीने वागू लागली आहेत. दिलेली जबाबदारी मनापासून पार पाडू लागली आहेत. नियमांचे पालन करू लागली आहेत त्यामुळे वक्तशीरपणा, शिस्त, नीटनेटकेपणा या गोष्टी मुलांमध्ये चांगल्याच रुजल्या आहेत.

**३ विद्यार्थी शिक्षक यांच्या नात्यामध्ये झालेला बदल :**
शिक्षक विद्यार्थी जवळीक निर्माण झाली आहे त्यामुळे आम्हाला मुलांमधील विविध गुण–कौशल्ये ओळखण्यासाठी मोठी मदत झाली आहे. एकमेकांना असणाऱ्या समस्या आणि अडचणीचे निवारण होऊ लागले आहे आणि सर्वजण एकमेकांना समजून घेऊ लागले आहेत.

**४ शिक्षक शिक्षक यांच्यातील संबंध :**
शिक्षक शिक्षकांमध्ये विचारविनिमय होऊ लागलेत. ज्यामुळे अनेक विषयावर एकमेकात चर्चा घडून येऊ लागल्यात.

**५ शिक्षक म्हणून स्वतःमध्ये झालेला बदल :**
मुलांना खऱ्या अर्थाने ओळखायला लागल्याने त्यांच्या अडचणी समजून योग्य पद्धतीने बदल करता आला. त्यामुळे माझ्यात संयम वाढल्याचे जाणवले आहे आणि प्रत्येकाशी सुसंवाद घडू लागला आहे.

**६ इतर :**
विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्यात विचारविनिमय होऊ लागला आहे. पालक आपले कर्तव्य जाणून घेऊन विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याशी सुसंवाद साधू लागले आहेत. या सर्वांमुळे वातावरणात आमूलाग्र बदल झाला आहे.



## SMF मास्टर ट्रेनरचे मनोगत

### मूल्यवर्धनचा आनंददायी प्रवास...

**सचिन जालिंदर वाळुंजकर**
प्रशिक्षक व जिल्हासमन्वयक सोलापूर आणि रायगड



मागील काही वर्षापासून मी मूल्यवर्धन कार्यक्रमाची वाढ अतिशय जवळून पाहिली आहे, यामध्ये वेगवेगळ्या प्रसंगाच्या निमित्ताने विविध कामे करण्याचा अनुभव मिळाला. या सगळ्या दरम्यान खूप शिकायला मिळाले खरे तर शिक्षणातील पदवी घेतल्यानंतर तो व्यक्ती परिपूर्ण झाला असे समजले जाते पण या पदवीचा आणि किबंहुना प्रत्यक्ष वापराचा अनुभव मिळाला तो, मूल्यवर्धनच्या माध्यमातून म्हणुनच माझ्या या लेखाला मी शीर्षक दिले आहे मूल्यवर्धनचा आंनददायी प्रवास..!

सुरुवातीला बीड जिल्ह्यांमध्ये मूल्यवर्धन शिक्षक म्हणून विद्यार्थ्यामध्ये विविध उपक्रमाच्या माध्यमातून मूल्यवर्धन रुजवण्याची संधी मिळाली आणि न कळत स्वत:कडे हि बघण्याची, त्यानंतर खऱ्या अर्थाने झपाट्याने कामाला सुरवात झाली. साहजीकच हा विषय तेवढ्याच आत्मीयतेने घेतल्यामुळे प्रत्येक काम आवडू लागले या प्रगतीच्या प्रत्येक मैलावर शांतिलाल मुथ्था फाउंडेशनसारखी वैचारिक खाण आणि तिचे निर्माते श्री. मुथ्था सर यांची प्रेरणा सतत मनात तेवत होती. श्री. मुथ्था सर यांच्याबाबत मला एका विचारवंत B. C. Forbes याच्या दोन ओळी तंतोतंत लागू पडतात असे वाटते, तो म्हणतो ''अतिशय यशस्वी लोकांचा जो वेगळेपणा मला वेळोवेळी दिसून आला तो म्हणजे त्यांची काम करण्याची अमर्यादित क्षमता.''

मूल्यवर्धन शिक्षक म्हणून सुरु केलेले काम येऊन ठेपले ते 'मूल्यवर्धन प्रशिक्षक' या टप्प्यावर. प्रशिक्षकाचे काम करतांना विषय ज्ञान तर महत्वाचे असतेच त्याच बरोबर काही कौशल्य जाणीवपूर्वक अंगी बाणावी लागतात ज्याच्यामुळे आपला दृष्टिकोन इतरांपर्यंत सहज आणि थेट पोहचवता येतो. विशेषत: जे प्रशिक्षणार्थी कित्येक वर्षापासून शिक्षण क्षेत्रात काम करत असतात त्यांच्याबाबत तर ही विशेष काळजी घ्यावी लागते. या पलीकडे जाऊन मी म्हणेन की त्यांच्या भावनांचा आदर आणि विनम्रता हे तर प्राधान्याने जपावेच लागते. खूप गोष्टी आपल्या समोर असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांच्याकडूनही शिकण्याजोग्या असतात. चांगली मैत्री कशी असावी याचे उत्तम उदाहरण म्हणून विद्या प्राधिकरण आणि शांतिलाल मुथ्था फाउंडेशन यांचे द्यावेसे वाटते. मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीत महाराष्ट्र शासन आणि त्यांचे सर्व शासकीय अधिकारी यांचा सिंहाचा वाटा आहे.

प्रशिक्षण म्हटले की, ''काहीतरी व्याख्यान, भाषण असे असणार!'' अशी एक धारणा प्रशिक्षणार्थीची असते पण जेव्हां मूल्यवर्धन प्रशिक्षणाचा अनुभव येतो तेव्हां मात्र प्रशिक्षणार्थी याची वेगळीच व्याख्या करू लागतात कारण या प्रशिक्षणाला आम्ही म्हणतो 'मूल्यवर्धन कार्यशाळा' आणि या कार्यशाळेत सर्व काही स्व-कार्य आणि अनुभव घेत करावे लागते. आणि साहजिकच प्रशिक्षणामधील त्यांचा उत्साह वाढतो याचे मुख्य कारण असे आहे की, लोकशाही कामकाजाची पद्धत आणि तिचा अनुभव प्रत्यक्ष प्रशिक्षणार्थ्यांना देणे. याचे उदाहरण म्हणून प्रशिक्षणाच्या पहिल्याच दिवशी अगदी सुरुवातीलाच ते सर्वजण मिळून काही नियम बनवतात आणि ते कोणते असावेत हे पण प्रशिक्षणार्थीच ठरवतात. एका सोलापूर च्या प्रशिक्षणात ''सर्वांनी वेळेवर यावे'' असा नियम सर्वानुमते तयार करण्यात आला होता आणि शेवटच्या दिवशी काही कारणास्तव प्रशिक्षण सकाळी ७.१५ ठेवण्यात आले होते, तर त्यादिवशी सर्व प्रशिक्षणार्थी सकाळी ६:३० [illegible] उपस्थित होते. अशा गोष्टी घड[illegible] म्हणजे खऱ्या अर्थाने मूल्यवर्धनची खरी यशस्वीता म्हणता येईल.



शासन आणि शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचा मूल्यांचा हा महायज्ञ जेव्हा प्रत्यक्ष शाळेत पहायला मिळतो तेव्हां प्रशिक्षकाला जे समाधान मिळते ते कोणत्याही तराजूत मोजता येत नाही...!

शेवटी प्रत्येक प्रशिक्षकाला थॉमस एडिसन चे पुढील वाक्य लक्षात ठेवायला हवे ''न थकता अविरतपणे संपूर्ण शारिरीक आणि मानसिक शक्ती एका गोष्टीवर केंद्रित करणे ही यशासाठी लागणारी पहिली अट आहे''.

धन्यवाद...!

## मूल्यवर्धन शिक्षकांसाठी

**शिक्षक बंधू भगिनींनो, खाली दिलेली गाणी तुम्ही मूल्यवर्धनच्या उपक्रमात समाविष्ट करून पहा :**

### अंकगाणे

एक दोन तीन चार
जिकडे तिकडे हिरवे गार.
पाच सहा सात आठ
तळे भरले काठोकाठ.
नऊ दहा अकरा बारा
इकडून तिकडे सुटला वारा.
तेरा चौदा पंधरा सोळा
मुले सारी झाली गोळा.
सतरा अठरा एकोणीस वीस
वाऱ्यावरनं आलं पीस
पीस आहे मोराचं
रान पिकलं बोराचं
खिसे भरले बोरांनी
गंमत केली पोरांनी

– डॉ. विजया वाड



चित्र : कु. मिथिलेश रणजित रुपे
इयत्ता: नववी, मुलुंड विद्यामंदिर

### अट्टी कट्टी

''अट्टी बट्टी तुझ्यापाशी कट्टी
खेळायला घेणार नाही तुला कध्धी
चिंचेचं बुटुक लाललाल चुटुक
एकटीनं खाल्लंस दिलं नाहीस मला
एवढी नको ऐटीत माहीत आहेस मोठ्ठी
भातुकलीच्या खेळात घेणारच नाही
बकुळीची फुलं आणि रंगीत खडू
मागायला ये मुळी देणारच नाही''
बरं बाई चुकले विसरले खरी
एवढ्याश्या चिंचेसाठी भांडण कशाला ?
हा घे पेढा अर्धा अर्धा खाऊ या
चिमणीच्या दातांनी तोडून देते तुला

– मालती मराठे



चित्र : कु. पुरी पांडुरंग अशोक
संदेश विद्यालय, विक्रोळी

## माजी उपकुलपती मा. श्री आर गोविंदा यांच्याकडून खंडाळा तालुक्यातील मूल्यवर्धन कार्यक्रमाची पाहणी




मा. प्रा. श्री. आर. गोविंदा माजी उपकुलपती (राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन विद्यापीठ), तसेच माजी संचालक (राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद–NCERT)नवी दिल्ली, जे.पी.नाईक शिक्षण आणि संस्कृती अभ्यास तसेच भारतीय सामाजिक संबंध परिषदेचे सदस्य होते. त्यांनी विविध शैक्षणिक संस्था, लंडन विद्यापीठ तसेच एम.एस. युनिवर्सिटी, बडोदा तसेच आंतरराष्ट्रीय शैक्षणिक नियोजन संस्था, यूनेस्को, पॅरीस अशा विद्यापीठांना अतिथी प्राध्यापक (Visiting Professor) म्हणून मार्गदर्शन केले असून ते अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांचे जसे की यूनेस्को, सल्लागार आंतरराष्ट्रीय देखरेख अहवाल इ.चे सदस्य आहेत. प्राथमिक शिक्षण, विकेंद्रित व्यवस्थापन, धोरण विश्लेषण, मानव अधिकार व लोकशाही यामध्ये त्यांची ख्याती आहे. मा. प्रा. गोविंदा हे शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे बोर्ड मेंबर व मूल्यवर्धनसाठी सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. मा. श्री. आर गोविंदा आणि श्रीमती. अमिता गोविंदा यांनी खंडाळा तालुक्यातील (जि. सातारा) शिवाजीनगर व मळाईवस्ती ह्या दोन शाळांना दि. ५/२/२०१९ रोजी भेट दिली. त्यांनी शाळेत सुरु असलेले मूल्यवर्धन उपक्रम पाहिले तसेच शिक्षक आणि विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला. केंद्रातील शिक्षकांशी संवाद साधून त्यांना उपक्रम राबवत असताना आलेल अनुभव व मूल्यवर्धन उपक्रमाची गरज यावर सविस्तर चर्चा करून त्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, ''आम्ही तर मूल्यवर्धनाची सुरूवात करुन जाणार आहोत, परंतू यापुढे तुम्ही हा उपक्रम सुरू ठेवण्यासाठी तुम्हाला स्वत:ला त्या उपक्रमात उडी मारणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य, न्याय, समता, बंधूता ही मूल्ये स्वतः आत्मसात करून ती विद्यार्थ्यांमध्ये उतरविली पाहीजेत.'' तसेच त्यांनी या उपक्रमात सातत्य ठेवणे किती महत्वाचे आहे हेही सांगितले.

## निफाड (नाशिक) तालुक्यातील प्रेरकांचा सन्मान सोहळा !!



निफाड (नाशिक) तालुक्यातील सर्व प्रेरकांना त्यांनी केलेल्या कामाचा गौरव आणि त्यातून त्यांना प्रेरणा मिळावी या हेतूने या प्रेरकांचा सन्मान सोहळा दि.१५ फेब्रुवारी २०१९ रोजी पंचायत समिती निफाड येथे पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन शिक्षण विभाग निफाड व शांतिलाल मुथ्था फाउंडेशन यांनी केले. या कार्यक्रमासाठी मा. गटशिक्षण अधिकारी श्रीमती. सरोज जगताप, पंचायत समिती निफाड विस्तार अधिकारी श्री. चव्हाण, श्री. गायकवाड व सर्व केंद्रप्रमुख व साधनव्यक्ती उपस्थित होते.

## मूल्यवर्धन जिल्हा समन्वयक राज्यस्तरीय कार्यशाळा




महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था (विद्या प्राधिकरण) पुणे, अभ्यासक्रम विकसन विभाग व शांतिलाल मुथ्था फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मूल्यवर्धन जिल्हा समन्वयक राज्यस्तरीय कार्यशाळा दि. ६ व ७ मार्च २०१९ रोजी हॉटेल सोरीना, पानशेत, पुणे या ठिकाणी मा. डॉ. सुनिल मगर साहेब (संचालक, MSCERT) यांच्या प्रेरणेने तसेच मा. विकास गरड साहेब व मा. भटकर साहेब (उपसंचालक,MSCERT) यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.

या कार्यशाळेप्रसंगी डॉ. इरफान इनामदार (अभ्यासक्रम विकसन विभाग, विद्या प्राधिकरण, पुणे) यांनी मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आढावा, प्रशिक्षणार्थींचे अनुभवकथन तसेच मूल्यवर्धन पाठपुरावा करण्यामध्ये DIECPD ची जबाबदारी यावर सखोल चर्चा केली. श्री. विद्याधर शुक्ल (सल्लागार, SMF), श्रीमती मीनल दशपुत्रे (डायरेक्टर, प्रोग्राम क्वॉलिटी SMF, पुणे), श्री. लक्ष्मीनारायण (मूल्यवर्धन प्रोजेक्ट हेड, SMF, पूणे), श्रीमती मेघना देसाई, यांनी मूल्यवर्धन संनियंत्रण प्रणाली, मूल्यवर्धन कार्यक्रमाचे गुणवत्तापूर्ण निरीक्षण व पाठपुरावा योग्य दिशेने व्हावा या संदर्भात मार्गदर्शन केले. तर श्री. व्यंकटरमणा (मुख्य कार्यकारी अधिकारी, SMF, पुणे) यांनी या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी सर्वोत्तपरी सहकार्य आम्ही सातत्याने करणार आहोत असे मत मांडले.


## कोल्हापूर येथे मूल्यवर्धन जिल्हा समन्वयक विभागीय कार्यशाळा संपन्न



मूल्यवर्धनची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरिता विचार विनिमय व नियोजन करण्यासाठी दिनांक ११ मार्च रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या ५ जिल्ह्यांची विभागीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेचे उदघाटन कोल्हापूर DIECPD चे प्राचार्य मा. श्री. शेख सर यांनी केले. त्यावेळी सांगलीचे प्राचार्य मा. श्री. सलगर सर, तसेच सिंधुदुर्गाचे प्राचार्य मा. श्री. पाटील सर उपस्थित होते. याशिवाय वरील ५ जिल्ह्यांचे प्रतिनिधी म्हणून गटशिक्षण अधिकारी, विस्तार अधिकारी आणि विषयसाधन व्यक्ती उपस्थित होते. SMF चे मुख्य प्रशिक्षक श्री. स्वप्नील करवा यांनी तालुकास्तरावर केंद्रप्रमुखांच्या मदतीने मूल्यवर्धन कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याविषयीचे मार्गदर्शन केले व जिल्हा पातळीवर तसेच वर्ग निरीक्षणामध्ये त्यांची काय भूमिका आहे या वर PPT च्या माध्यमाने चर्चा केली. पाचही जिल्ह्यातील प्रतिनिधींनी त्यांचा जिल्ह्याचे नियोजन सादर केले. कार्यक्रमाचा परिचय कोल्हापूर DIECPD च्या अधिव्याख्याता इंगळे मॅडम यांनी केला व कोल्हापूर म.न.पा.चे प्रशासन अधिकारी मा. श्री. एस. के. यादव यांनी आभार मानले.

## मान्यवरांचे अभिप्राय

### श्री. शांतिलाल मुथ्था, संस्थापक-अध्यक्ष, शांतिलाल मुथ्था फाउंडेशन



"मूल्यवर्धनचे पहिले संवादपत्र आपल्या समोर सादर करताना मला आनंद होत आहे. भारतीय संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये हसत-खेळत, कृतींच्या माध्यमाने, तणावमुक्त वातावरणात रुजविणे हे मूल्यवर्धनचे वैशिष्ट आहे. महाराष्ट्र राज्य शासनाने मूल्यवर्धनचा अभ्यासक्रम पूर्णपणे स्विकारला आहे. गेल्या तीन वर्षांपासून मूल्यवर्धन महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सुरु असून यावर्षी तो सर्व ६७००० शाळांपर्यंत पोहोचणार आहे.

गेल्या तीन वर्षांचा अनुभव पाहता महाराष्ट्र राज्य शासन, विद्या परिषद, सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, गट-शिक्षणाधिकारी, शिक्षक व प्रेरक (मास्टर ट्रेनर्स) तसेच DIECPD चे प्राध्यापक व विषय साधन व्यक्ती या सर्वांच्या अथक परिश्रमाने मूल्यवर्धनची वाटचाल वेगाने सुरु आहे. मी स्वतः दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये जाऊन, शाळांना भेटी देऊन मूल्यवर्धनचा आढावा घेतला होता. मला हे सांगण्यास आनंद वाटतो की विद्या परिषद व शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे अधिकारी यांनी मिळून आतापर्यंत ४३५५८ वर्गांमध्ये जाऊन वर्ग निरीक्षण केले. या निरीक्षण अहवालांवरून निदर्शनास येत आहे की, मुलांमध्ये व शिक्षकांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल घडत चालले आहेत. शाळांमध्ये विद्यार्थी-केंद्रित शिक्षण पद्धती रुजू होत आहे. मुलांची भाषाही जास्त चांगली होऊ लागली आहे. विद्यार्थ्यांची शाळेतील गळती कमी होण्यास मदत होत आहे व मुलांची पटसंख्या वाढत असल्याचे दिसून येत आहे.

महाराष्ट्र शासनाबरोबरच गोवा राज्यातील सर्व शासकीय शाळा, खाजगी शाळा तसेच इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मूल्यवर्धनची अंमलबजावणी सुरु आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस आणि शिक्षणमंत्री मा. श्री. विनोदजी तावडे यांनी अनेक वेळा आढावा बैठका घेऊन समाधान व्यक्त केले आहे. गोवा राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय मनोहरजी पर्रीकर यांनी सुद्धा वेळोवेळी आढावा बैठका घेतल्या आहेत व मूल्यवर्धन संपूर्ण शाळांमध्ये राबविण्यासंदर्भात गोवा विधानसभेमध्ये प्रस्ताव पारित केला आहे.

सर्वच ठिकाणी मूल्यवर्धन संदर्भात पालकांचा व शिक्षकांचा मोठ्या प्रमाणात उत्साह असल्याचे जाणवत आहे. सर्वांनी मूल्यवर्धन आणखी वाढावे यासाठी प्रयत्न करावेत व आपणाकडे ज्या काही मूल्यवर्धन यशोगाथा असतील त्या आमच्याकडे MV-App च्या माध्यमाने पाठवाव्यात. एकूणच मूल्यवर्धन यशस्वी होण्यामध्ये सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख व गट-शिक्षणाधिकारी यांचा मोलाचा वाटा आहे, या सर्वांच्या चरणी नमन."

### श्री. वेंकटरमणा, मुख्य कार्यकारी अधिकारी, शांतिलाल मुथ्था फाउंडेशन



"मूल्यवर्धन हा कार्यक्रम महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाने राबवायचे ठरवले तेव्हापासून मी शांतिलाल मुथ्था फाउंडेशनमध्ये कार्यरत आहे. हा कार्यक्रम महाराष्ट्रातील २१५ तालुक्यांपर्यंत यशस्वीपणे पोहचविण्यात आमच्या संस्थेला MSCERT (विद्या प्राधिकरण) यांचे मोलाचे सहकार्य मिळाले त्याबद्दल मी स्वतःला नशीबवान समजतो.

मला हे सांगण्यास अत्यंत आनंद होतो आहे की, मूल्यवर्धन कार्यक्रमाला MV-App सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यामुळे बरेच काम सोपे झाले आहे. सध्या DIECPD अधिव्याख्याता, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक आणि शिक्षक असे एकूण ८२४३८ संबंधित या App चा वापर करीत आहेत. याप्रकारच्या तांत्रिक सोईमुळे सर्व संबंधितांचे लिखाण काम वाचले आहे आणि या App मध्ये मूल्यवर्धन आशयाबरोबरच शिक्षकांच्या केलेल्या मूल्यवर्धन वर्ग निरीक्षणांचा अहवाल सुद्धा सहज पाहता येतो, अशी सर्व अद्ययावत माहिती ताबडतोब उपलब्ध होत आहे. त्यामुळे आपले केंद्र, आपला तालुका किंवा जिल्हा मूल्यवर्धन अंमलबजावणीमध्ये कोणत्या स्तरावर आहे हे सहज समजून त्यानुसार अंमलबजावणीमध्ये अपेक्षित बदल करता येतात. येणाऱ्या काळामध्येही या MV-App चा वापर जास्तीतजास्त करावा हीच अपेक्षा."



TATA TRUSTS

शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

[illegible] :

शांतिलाल मुथ्था फाउंडेशन, ८ वा मजला, मुथ्था चेंबर्स -२, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११०१६. फोन नं. ०२० ६६०५००००

info@mutthafoundation.org | www.mutthafoundation.org